FORM-1A 0068624 N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. १, वर्ष २०२४, दिनांक २१/०२/२०२४
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............
3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून २०/०२/२०२४ वेळ ११:४२ तारीख पर्यंत — , वेळ १३:१९
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख ०८/०२/२०२४, वेळ १६:३०
   Information received at P. S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ............, तारीख ............, वेळ ............
   General Diary Reference : Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा १५ कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. कुर्ला
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ध.क.व्य. विभाग, ठिकाणाचे नंबर गरिमा ऑफिस, गल्ली ..., अंधेरी, रस्त्याचे कुर्ला रोड
   Address of Occurrence Name कुर्ला मुंबई if any ४०००७० Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ............, गाव ............, पोस्ट ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव : ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव विनोद रघुनाथ सोनकांबळे (b) वडिलांचे / पतीचे नाव रघुनाथ सोनकांबळे
   Name Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय ४८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9224318040
   Date of Birth and Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक —, दिल्याचा दिनांक — दिल्याचे ठिकाण — (f) व्यवसाय ............
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste —, जनजात Sub-Caste —
   (h) पत्ता ............, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
   Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
   रस्त्याचे नाव ८/2 भीमज्योत बुध्द विकास कमिटी, जवळचे प्रसिद्ध ठिकाण, गाव वाल्मीकी नगर, पोस्ट, नेताजी पालकर मार्ग पो. स्टे.
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका घाटकोपर (पश्चिम), जिल्हा, मुंबई राज्य ४०००८४ सध्याचा पत्ता ............
   Taluka Dist. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B or attach FIR 1-B to case diary.)

१) शिरीष कारभारी दगडखैर ३५ वर्षे, नोकरी- कनिष्ठ आवेक्षक, ध.क.व्य. बृमनपा, रा.ठी. गायत्री निवास २०२, सेक्टर-५, कामोठे, नवी मुंबई

२) नितिन माणिक साबळे ४७ वर्षे, नोकरी- मुकादम, ध.क.व्य. बृमनपा रा.ठी. A/704, बि.नं. २०, म्हाडा वसाहत वाशीनाका, आरसीएफ, मुंबई

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

फिर्यादी विनोद रघुनाथ सोनकांबळे वय ४८ वर्षे
धंदा- व्यवसाय रा.ठी. ८/२ भीम जिवन चाळ कमिटी, वाल्मीकी
नगर, नेताजी पालकर मार्ग, घाटकोपर (प) मुंबई ८४
यांचा स्वतंत्र कागदावर संगणीकृत करण्यात आलेला
जबाब गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Gaikwad C.B

(चंद्रशेखर गायकवाड)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

जबाब दि. १०/०१/२०२४

श्री. विनोद रघुनाथ सोनकांबळे, वय ४८ वर्षे, धंदा– व्यवसाय (लेबर पुरविणे), पत्ता – ८/२, भिमजीवन चाळ कमेटी, वाल्मीकीनगर, हिमालय सोसायटी समोर, नेताजी पालकर मार्ग, घाटकोपर (प) मुंबई ४०० ०८४, मोबाईल क्र. ९२२४३१८०४०, आधार कार्ड क्र. ६९१९ ७९२७ ५२०९

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्त्यावर २५ वर्षापासुन रहावयास आहे. माझा बृहन्मुंबई महानगरपालिकेला आवश्यक असणारे कामगार (लेबर) पुरविणे, तसेच कॅटरिंगचा व्यवसाय असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

मी 'मे. सुहासिनी महिला बचत गट' या संस्थेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एल वॉर्ड मध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानांतर्गत नमुद संस्थेचा पर्यवेक्षक म्हणून काम पाहतो. आमच्या संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेचे स्वच्छतेचे काम करण्याचे माहे ऑक्टोबर – २०२३ मध्ये टेंडर (निविदा) पास झाले आहे. त्याअनुषंगाने १४ स्वच्छता स्वंयसेवक एल वॉर्डमध्ये स्वच्छता करण्याचे काम करीत आहेत. स्वच्छता काम करण्याचे काम करणाऱ्या संस्थेच्या स्वंयसेवकांना कामाचे मानधन म्हणून देण्यात येणारी बिलाची मासिक रक्कम रु ८४,०००/– ही दरमहा मंजुर करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एल विभागातील कनिष्ठ अवेक्षक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांची मंजुरी आवश्यक असते. तसेच मी यापूर्वी मे. रोशनी महिला सेवाभावी संस्थेचे देखील पर्यवेक्षक म्हणून काम पाहिले असून नमुद संस्थेचे बिल मंजूर करून घेण्याचे काम देखील केलेले आहे.

मी साधारणपणे माहे डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यांचे बिल मंजुरीकरीता एल विभागातील कनिष्ट अवेक्षक श्री. शिरीष दगडखैर यांना गरीमा चौकी, घनकचरा व्यवस्थापन, अंधेरी – कुर्ला रोड, मुंबई येथे भेटलो असता त्यांनी नमुद प्रत्येकी बिलाची रु ३,०००/– प्रमाणे रु ६,०००/– व पूर्वीच्या मे. रोशनी महिला सेवाभावी संस्थेच्या माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०२३ चे रु ९,०००/– असे एकुण रु १५,०००/– इतक्या लाचेची मागणी केली व त्यावेळी माझेकडे पूर्ण रक्कम नसल्याने मी त्यांना रु ६,०००/– इतकी रक्कम दिली होती. त्यावेळी त्यांनी मागील ९,०००/– व माहे डिसेंबर – २०२३ चे रु ३,०००/–असे रु १२,०००/– इतकी रक्कम डिसेंबर २०२३ चे बिल मंजुरीकरीता येताना घेऊन येण्यास सांगितले.

माझी श्री. शिरीष दगडखैर, कनिष्ठ अवेक्षक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, एल विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे दिनांक ०९/०१/२०२४ रोजी सायंकाळी १६.१५ वा. चे सुमारास समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. गायकवाड व पो.नि देवकर यांना भेटलो असता त्यांनी श्री. शिरीष दगडखैर, कनिष्ठ अवेक्षक, हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले मी माझा तक्रार अर्ज मराठी भाषेमध्ये लिहून देवून त्यावर माझी सही केली. त्यानंतर पोनि गायकवाड यांनी पो.नि. देवकर यांच्याशी ओळख करून दिली व ते नमुद कारवाईदरम्यान पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगितले.

समक्ष,

GaikwadCB

( चंद्रशेखर गायकवाड ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्यादी श्री. विनोद रघुनाथ सोनकांबळे यांचा दि.१०/०१/२०२४ रोजीचा जबाब पुढे चालू.........

सदर वेळी लोकसेवकाची कामाची वेळ ही सकाळी ०६.३० वा. ते दुपारी १.३० वा. अशी असल्याने पडताळणी कारवाई दिनाक १०/०१/२०२४ रोजी सकाळी करणे उचित होईल असे सांगून लोकसेवक यांनी मला उद्या भेटण्यास बोलावले असल्याचे पो.नि. गायकवाड यांना सागितले. त्यानंतर पो. नि. गायकवाड यांनी सदरचा अर्ज त्यांचे स्वत:चे ताब्यात ठेवून दि. १०/०१/२०२४ रोजी सकाळी ९.३० वा. माझे तक्रारीची पडताळणी करण्यासाठी ला.प्र.कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

त्यानूसार पो.नि. गायकवाड यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक १०/०१/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी येथील कार्यालयात हजर झालो असता त्यावेळी पो.नि. गायकवाड यांनी तेथे हजर असलेल्या दोन शासकीय पंचांशी माझी ओळख करून दिली. पो.नि. गायकवाड यांनी पंचांना माझे तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. गायकवाड यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. गायकवाड यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज त्यांचे स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि गायकवाड यांनी दिनांक १०/०१/२०२४ रोजी एल विभाग अंतर्गत असणाऱ्या गरीमा चौकी, घनकचरा व्यवस्थापन विभाग, अंधेरी – कुर्ला रोड येथील कनिष्ट अवेक्षक श्री. शिरीष दगडखैर यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी शासकिय पंचांसह जावून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतमध्ये परिधान केलेल्या बनियनला आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून त्यात होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि गायकवाड यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून सी–लिंक, पश्चिम दुतगर्ती मार्ग, मुंबई आतंरराष्ट्रीय विमानतळ रोडवरून हसनपाडा रोडवरील ताज सॅट्स हॉटेलजवळ शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि. गायकवाड यांनी कनिष्ट अवेक्षक श्री. शिरीष दगडखैर यांचे कार्यालय गरीमा चौकी, घनकचरा व्यवस्थापन विभाग, सफेद पुल, अंधेरी–कुर्ला रोड, कुर्ला (प), मुंबई येथे पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतमध्ये परिधान केलेल्या बनियनला आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. अमित ढोकरट यांचेसह ऑटो रिक्षाने अंधेरी – कुर्ला रोडजवळ जावून तेथे पार्क केलेली माझी मो. स्कुटर क्र. एम.एच. ०३ ईडी ०००५ घेवून तेथून मो. स्कुटरने मी व पंच श्री. ढोकरट असे कनिष्ठ अवेक्षक दगडखैर यांना भेटण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभाग, गरीमा चौकी, सफेद पुल येथे गेलो. चौकीस बाहेरून कडी असल्याने मी श्री. शिरीष दगडखैर यांना मोबाईलवर फोन केला असता प्रथम त्यांनी फोन उचलला नाही त्यानंतर मी पुन्हा श्री. शिरीष दगडखैर यांना फोन केला असता, त्यांनी मला ते सध्या बाहेर असून काही वेळात चौकीत येत असल्याचे सांगून चौकी बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच चौकी बाहेर थांबलो असता श्री. शिरीष दगडखैर हे बाहेरून चौकी जवळ आले व आम्ही चौकीमध्ये जावून तेथे कनिष्ट अवेक्षक श्री. शिरीष दगडखैर यांची भेट घेतली. त्यावेळी शिरीष दगडखैर व माझेमध्ये कामासंबधीत चर्चा झाली. चर्चे दरम्यान श्री शिरीष दगडखैर यांनी माझेकडे तडजोडीअंती प्रतिबिल रू. २,५००/– प्रमाणे चार बिलांकरीता रूपये १०,०००/– इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केली. त्यावेळी

समक्ष,

Gaikwad CB

( चंद्रशेखर गायकवाड ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्यादी श्री. विनोद रघुनाथ सोनकांबळे यांचा दि.१०/०१/२०२४ रोजीचा जबाब पुढे चालू.........

मी श्री शिरीष दगडखैर यांना एटीएममधून पैसे घेवून परत येतो असे सांगून त्यांचे चौकीमधून पंचासोबत बाहेर येवून पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. गायकवाड व पो.नि. देवकर यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत पंचास व मला विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचांसमक्ष ऐकले. लोकसेवक शिरीष दगडखैर, कनिष्ठ अवेक्षक यांनी पडताळणी दरम्यान रूपये १०,०००/– इतक्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लाचेची रक्कमेची तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे मला सांगितले.

त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/– (रू. ५००/– दराच्या २० भारतीय चलनी नोटा) स्वतःचे ताब्यात घेतल्या. सदर नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन ॲंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. गायकवाड यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर उजव्या हाताच्या अंगठयाने थम करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस ॲंथ्रासीन पावडर लावली व ॲंथ्रासीन पावडर लावली लाचेची रक्कम माझे पॅन्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर पोनि गायकवाड यांनी माझे शर्टाचे आतमध्ये मी परिधान केलेल्या बनियनला आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावला व मला पंच श्री. ढोकरट यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे गरीमा चौकी, सफेद पुल, अंधेरी–कुर्ला रोड येथे ॲक्टीव्हा मो/स्कुटरने पाठविले. माझे पाठोपाठ पंच क्र. ०१ श्री. रणजित चव्हाण व पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ गेलो असता लोकसेवक दगडखैर हे मला कार्यालयात दिसले नाही. त्यामुळे मी माझे मोबाईल क्र. ९२२४३१८०४० वरून लोकसेवक दगडखैर यांचे मोबाईल फोन क्र. ८६९२८५४४४८ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला नाही. त्यानंतर मी पुन्हा लोकसेवक दगडखैर यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता ते वॉर्डात कामानिमीत्त गेले असून तेथून घरी जाणार असून मला नंतर भेटण्यास येण्यास सांगितले परंतु सदरवेळी मला नंतर काम असल्याने मला शक्य नाही असे सांगितले असता त्यांनी चौकीमधील मुकादम नितीन साबळे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर मी पुन्हा लोकसेवक दगडखैर यांना मोबाईलवर फोन करून सदरबाबत नितीन साबळे यांना संपर्क करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी गरीमा चौकीमध्ये मुकादम नितीन सांबळे यांना भेटण्याकरीता गेलो असता माझ्या समोरच त्यांना कनिष्ट अवेक्षक दगडखैर यांचा फोन आला व त्यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. लोकसेवक नितीन सांबळे यांनी मागितल्यानंतर माझे कडील ॲंथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १०,०००/– (रू. ५०० दराच्या २० भारतीय चलनी नोटा) त्यांना दिली असता त्यांनी त्यांच्या पांढऱ्या रंगाच्या शर्टाच्या वरील खिशामध्ये ठेवली. लोकसेवक साबळे यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशारीतीने सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे उजव्या हाताने थमचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक साबळे यांस रू. १०,०००/– लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर पो.नि. गायकवाड

समक्ष,

Gaikwad CB

( चंद्रशेखर गायकवाड ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्यादी श्री. विनोद रघुनाथ सोनकांबळे यांचा दि.१०/०१/२०२४ रोजीचा जबाब पुढे चालू.........

व पो.नि. देवकर यांनी कनिष्ट अवेक्षक शिरीष दगडखैर यांच्याबद्दल विचारणा केली असता ते एल वॉर्ड, कुर्ला येथे गेले असल्याचे सांगितले. त्यामुळे पो.नि. देवकर व सापळा पथकातील दोन अमंलदार व पंच ढोकरट असे शासकीय वाहनानी एल. वॉर्ड कुर्ला येथे गेले व काही वेळानी कनिष्ठ अवेक्षक दगडखैर यांना घेवून चौकीमध्ये परत आले.

त्यानंतर मी, दोन पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व लोकसेवक कनिष्ट अवेक्षक व मुकादम नितीन साबळे असे आम्ही सर्व दोन शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालय, वरळी येथे आलो. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी, कनिष्ट अवेक्षक शिरीष दगडखैर यांनी मी पर्यवेक्षक असलेल्या मे. सुहासिनी महिला बचत गट व रोशनी महिला सेवाभावी संस्थेच्या स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानातंर्गत स्वंयसेवकांना स्वच्छता कामाचे मानधन म्हणून देण्यात येणा-या रकमेच्या बिलाच्या मंजुरीकरीता प्रति बिल रू.२,५००/- प्रमाणे असे चार बिलांचे एकूण रूपये १०,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करून ती श्री. दगडखैर यांचे सांगण्यावरून मुकादम नितीन साबळे यांनी त्यांच्यावतीने स्वीकारली म्हणुन माझी कनिष्ट अवेक्षक शिरीष दगडखैर व मुकादम नितीन साबळे यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

कनिष्ट अवेक्षक शिरीष दगडखैर व मुकादम नितीन साबळे यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पहिली असता ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( चंद्रशेखर गायकवाड ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......तात्काळ......

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... रु. १०,०००/- ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...... — ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

बाजूस नमुद ता. वे. व ठिकाणी कॉलम क्र. ७ मधील आलोसे क्र. १ यांनी फिर्यादी पर्यवेक्षक असलेल्या मे. सुहासिनी महिला बचत गट या संस्थेमार्फत, स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानाअंतर्गत केल्या जाणाऱ्या स्वच्छता कामाचे बील मंजूर करण्यासाठी तडजोडी अंती प्रति बील रु. २५००/- प्रमाणे असे एकूण ४ बीलांचे रु. १०,०००/- इतक्या लाचेची मागणी केली व आलोसे क्र. १ यांच्या सांगण्यावरुन आलोसे क्र. २ यांना लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले म्हणून कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

......पो.नि. चंद्रशेखर गायकवाड......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, — ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...—..., जिल्हा ...—..., राज्य ...—

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........

District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

Gaikwad C.B

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...चंद्रशेखर गायकवाड...

पदनाम Rank...पोलिस निरीक्षक...

तपासिक अं. चा कोड क्र. ...ला.प्र.वि. मुंबई...

Posting

Code No. of I. O. ........

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयांस सादर केल्याची तारीख...२२/०९/२०२४...

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**